**स. क्रि.केस नं. १६३/२०२२**

श्री. वारणा विभाग सह ग्राहक मंडळ वि. सचिन सर्जेराव चौगुले

**नि. १६/क/लगत**

<u>उलटतपास आरोपीतर्फे साक्षीदार क्र. १ यांचा वकील श्री. एस.पी.लोखंडे यांचेतर्फे सुरु,</u>

०९. मी फिर्यादी संस्थेमध्ये ०५ जुलै १९७८ पासून नोकरी करीत आहे. माझे शिक्षण बी.ए.ऑनर्स असे झालेले आहे. मी आजमितीपर्यंत फिर्यादी संस्थेमध्ये शाखाधिकारी, वसुली अधिकारी तसेच मुख्य लेखापाल म्हणून नोकरी केलेली आहे. आमची मुख्य शाखा सोडून एकूण ४२ शाखा सध्या कार्यरत आहेत. हे म्हणणे खरे आहे की, ४२ शाखा हया कालावधीनुसार टप्प्याटप्याने स्थापन झालेल्या आहेत.हे म्हणणे खरे आहे की, प्रत्येक शाखेमध्ये झालेला दिवसाचा, महिन्याचा तसेच वर्षांचा कोणत्याही व्यवहाराबाबतची नोंद ही त्या शाखेत ठेवली जाते. तसेच सदरच्या व्यवहाराची नोंद ही मुख्य शाखेमध्ये देखील ठेवली जाते. हे म्हणणे खरे नाही की, ज्या शाखेमधून व्यवहार झाला ती शाखा वसुली करते. माझ्या माहितीप्रमाणे अंदाजे १० ते १५ माणसे ही आमच्या अकॉउंट शाखेमध्ये काम करतात. हे म्हणणे खरे नाही की, प्रत्येक शाखेचा एक अकॉउंटट असतो. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही एखादयाला माल उधारीवर देत असताना त्याबाबतचे पत्र त्याचेकडून घेत नाही. हे म्हणणे खरे आहे की, एखादयाला माल उधारीवर दिल्यानंतर त्याबाबत पत्रव्यवहार आम्ही करत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही आरोपीला माल दिल्याबाबतची पत्रांची देवाण घेवाण झालेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी याचे सोबत आमचा झालेला पत्रव्यवहार प्रस्तुत प्रकरणात मी हजर केलेला नाही. प्रस्तुत प्रकरणात आमचा आरोपीसोबत झालेला पत्रव्यवहार हजर करायची मला गरज वाटली नाही.

१०. ज्यावेळी आरोपी याने आमच्या संस्थेकडून माल उधारीवर नेला त्यावेळी मी चीफ ऑडिटर या पदावर काम करत होतो.

**प्रश्न –** तुम्ही आरोपीला किंवा एखादया व्यक्तीला माल पुरविता त्याबाबतचे डिमांड लेटर/यादी ही माल खरेदी करण्याच्या आधी तुम्ही घेता का ?

**उत्तर –** डिमांड यादी आम्ही घेतो. प्रस्तुत आरोपीकडून आम्ही लेखी डिमांड यादी घेतली होती.

११. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी याला आम्ही जेव्हा माल दिला त्या प्रत्येक तारखेचा तपशील फिर्याद, नोटीस व सरतपासाचे प्रतिज्ञापत्र नमूद नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, त्याबाबतचा खातेउतारा मी या कामी हजर केलेला आहे. प्रस्तुत कामी आरोपी याने प्रत्येक तारखेस किती माल उचलला याबाबतची खातेउताऱ्यातील तपशीलवार माहिती फिर्याद, नोटीस व सरतपासाचे प्रतिज्ञापत्र यामध्ये लिहिण्याची मला गरज वाटली नाही. प्रस्तुत आरोपीस पोचविलेल्या मालाच्या गुऱ्हाळघराचे नाव मला माहित नाही. प्रस्तुत आरोपीच्या नावाने आम्ही माल पोहोचविला होता. हे म्हणणे खरे आहे की, ज्या शाखेच्या शाखाधिकारी याने माल पोहोचविला होता त्याने त्याबाबतची कल्पना मला दिली होती. हे म्हणणे खरे आहे की , आमची संस्था सहकारी संस्था आहे. हे म्हणणे खरे आहे की, सहकारी संस्थेमधील व्यवहार हा लिखीत स्वरुपात केला जातो. हे म्हणणे खरे आहे की, ज्या शाखेकडून आरोपी याला माल पुरविण्याबाबत कळविले होते त्या शाखेकडून आम्हाला कव्हरिंग लेटर प्राप्त झाले होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी याला आमच्या संस्थेकडून माल पोहोच झाल्याबाबतचा खाते उतारा सोडून इतर कोणताही कागद अभिलेखावर हजर केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी याने आमच्या संस्थेकडे पाठविलेले डिमांड लेटर तसेच आमची संस्था त्याला माल देण्याबाबतचे पुर्तता पत्र मी या कामी हजर केलेले नाही.

१२. हे म्हणणे खरे आहे की, प्रत्येक शाखेचा ताळेबंद हा त्या शाखेत देखील ठेवला जातो. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी यास कोणत्या ठिकाणांहून आम्ही माल पोहोचविला त्याबाबतचा कागद मी या कामी हजर केलेला नाही. आरोपी यास ज्या ठिकाणांहून आम्ही माल पोहोचविला त्याबाबतचा कागद हजर करण्याची मला गरज

वाटली नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत कामातील ताळेबंद सोडून आरोपी याला माल पुरविल्याबाबतचा इतर कोणताही मी या कामी हजर केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी यास माल पुरविल्याबाबतचा माझ्या तोंडी पुराव्याव्यतिरिक्त इतर कोणताही पुरावा अभिलेखावर नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी याने माल स्वीकारल्या बाबतचे कोणतेही कागदपत्र मी अभिलेखावर हजर केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुत कामात कागद हजर नसल्यामुळे आरोपी याला कोणताही माल पोहोच झालेला नाही.

१३. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी यास फिर्यादी संस्थेने किती पोती साखर पुरविली याबाबतचा तपशीलवार मजकूर फिर्याद, नोटीस व सरतपासाचे प्रतिज्ञापत्र यामध्ये नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की, साखर प्रति क्वीटंल किती दराने आरोपी यास पुरविली याबाबतचा मजकूर फिर्याद, नोटीस व सरतपासाचे प्रतिज्ञापत्र यामध्ये नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी यास प्रति क्वीटंल किती दराने माल पुरविला याबाबतचे कागदपत्र मी हजर केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी यास किती पोती साखर पुरविली याबाबतचे कागदपत्र मी हजर केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, साखरेची रक्कम कोणत्या आधारे आम्ही आकारली होती याबाबतचा कोणताही कागदपत्र मी या कामी हजर केलेला नाही. मी हजर केलेला ताळेबंद सोडून इतर कागदपत्र हजर करायची मला गरज वाटली नाही. हे म्हणणे खरे आहे की, संस्थेमधील एखादा कागद कोर्टात हजर करायचा असेल तर त्यापूर्वी ठराव घेतला जातो. ज्या व्यक्तीसोबत व्यवहार केला जातो त्या व्यवहारासंबंधीचे सर्व कागदपत्र न्यायालयात हजर केले जातात किंवा कसे याबाबत मला माहिती नाही. मी फिर्याद, सरतपासाचे प्रतिज्ञापत्र व आमच्या वकिलांनी पाठविलेली नोटीस ही वाचली होती. प्रस्तुत फिर्याद, सरतपासाचे प्रतिज्ञापत्र व आमच्या वकिलांनी पाठविलेली नोटीस याबाबतचे कागदपत्र मी वाचले होते. फिर्यादी संस्थेने मला दि. २५.०२.२०२२ रोजी ठराव करुन दिला होता. दि. २५.०२.२०२२ रोजी झालेला ठराव हा **नि. २०** नाही. हे

म्हणणे खरे आहे की, दि. २५.०२.२०२२ रोजी आरोपीविरुद्ध फिर्यादी संस्थेने कोणताही ठराव पारीत केला नव्हता. (साक्षीदारास **नि. २०** वरील ठराव दाखविण्यात आला.) हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत ठरावामध्ये आरोपीविरुद्ध १३८ प्रमाणे डिमांड नोटीस पाठविण्याचे अधिकार नमूद नाहीत.

**प्रश्न –** तुम्हांला आरोपीविरुद्ध फिर्याद दाखल करा असे अधिकार ठरावात दिलेले आहेत का ?

**उत्तर –** प्रस्तुत ठरावामध्ये आरोपीविरुद्ध फिर्याद दाखल करण्याबाबत अधिकार मला दिलेले आहेत.

प्रस्तुत ठरावामधील मजकूर हा संचालक मंडळ ठरविते. प्रस्तुत मजकूर ठरावात काय नमूद असावा याबाबतचा निर्णय संचालक मंडळ घेते. ठराव माझ्यासमोर संमत झालेला आहे. प्रस्तुत ठराव हा आमच्या ऑफीसने बनविलेला आहे. धनादेश न वटल्याबाबत मला दि. ०६.०४.२०२२ रोजी माहिती प्राप्त झाली.

१४. हे म्हणणे खरे आहे की, जो व्यक्ती धनादेश देतो त्याच्या स्व हस्ताक्षरात त्यावरील तारीख व नाव लिहिले जाते. एखादया व्यक्तीकडून कोरा धनादेश प्राप्त झाल्यास त्या मधील मजकूर आमच्याकडून लिहिला जात नाही. धनादेश आम्ही कोणाकडूनही लिहून घेत नाही. प्रस्तुत आरोपीने आम्हाला दि. ०३.०४.२०२२ रोजी धनादेश दिला होता. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी याने दि. ०३.०४.२०२२ अशी तारीख लिहून आम्हाला धनादेश दिला होता. (साक्षीदारास **नि. २२** वरील धनादेश दाखविण्यात आला.) साक्षीदार स्वतःहून सांगतो की, आरोपी याच्या धनादेशावर आम्ही शिक्का मारुन घेतला होता. दि. ०३.०४.२०२२ रोजी आम्ही धनादेशावर शिक्का मारला होता. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुत आरोपीने आमच्या संस्थेस कोणताही धनादेश दिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत धनादेशावरील संस्थेचे नाव व तारीख सोडून इतर मजकूर हा पेनाने लिहिलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, धनादेशावरील रक्कम ही वेगवेगळया लोकांनी लिहिली नाही. हे म्हणणे खरे नाही की,

प्रस्तुत आरोपीने माझ्या समोर सही करुन कोणताही धनादेश दिलेला नाही. प्रस्तुत कामात आरोपी विरुद्ध नोटीस पाठविण्यास मी वकिलांना सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की, व्यवहाराची पुर्ण माहिती मी आमच्या वकिलांना दिली होती. प्रस्तुत कामातील **नि. २४** वरील नोटीस मी स्वतः वाचलेली आहे. त्या नोटीसीमधील प्रत्यक्ष मजकूर मी स्वतः वाचलेला आहे.   प्रस्तुत व्यवहाराबाबत माहिती का नमूद केली नाही याबाबत मी वकिलांना विचारले नव्हते. तसे विचारण्याची मला गरज वाटली नाही.

**उलटतपास वकिलांच्या विनंतीवरुन पुढील तारखेपर्यंत तहकूब**

श्रवणोत्तर स्विकृत ,

**सही/-**
**(के.दि.काकतकर)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पन्हाळा

दिनांक. १९.०५.२०२५